दैनिक भास्कर अकोला, शुक्रवार, 02 अगस्त, 2013 

## संवाद के जरिए

# एचआईवी पीड़ितों को नई राह

* संवाद हेल्पलाईन के जरिए 4300 पीड़ितों का समुपदेशन
* मुक्ता चैरिटेबल फाऊंडेशन पुणे का सराहनीय उपक्रम
* एचआईवी के साथ जीवन जीने की कला

**भास्कर न्यूज | अकोला.**

एचआईवी रिपोर्ट पाजीटीव आया है, अब मैं क्या करू? एचआईवी के साथ आहार कैसा रखे?, एआरटी गोलियां समय पर नहीं ली गई तो क्या होगा? घर में सभी के साथ रहने पर एचआईवी का संक्रमण होता है क्या? आदि कई सवाल लेकर संवाद करने वाले एचआईवी संक्रमित लोगों के फोन मुक्ता चैरिटेबल फाऊंडेशन पुणे की हेल्पलाईन पर आते है। इन विषयों पर जानकारी लेते समय मन की भावनाओं को राह मिलती है। कई बार आंखों के आसुओं का भी बांध टूट जाता है, साथ ही अपराधिक भावना, भविष्य को लेकर घोर चिंता, जीवन खत्म हो गया यह चिंता व्यक्त होती है। परंतु संवाद हेल्पलाईन के समुपदेशक फोन करने वाले व्यक्ति के सभी सवालों को गहराई से सुनकर समुपदेशन व्दारा शास्त्रीय जानकारी देते है। समुपदेशक एचआईवी पीड़ितों को जीवन की नई राह दिखाते है। इसमें से निर्माण होती है अपनेपन की भावना। हर माह एआरटी केंद्र में आने के बाद आशा वर्कर से फोन लेकर जरूरी संवाद किया जाता है। कभी-कभार यह संवाद लंबा चलता है समय का ध्यान तक नहीं रहता। यह किसी कहानी का वर्णन नहीं बल्कि अकोला के जिला अस्पताल की सत्यता है।

मुक्ता चैरिटेबल फाऊंडेशन पुणे अंतर्गत संवाद एचआईवी/एड्स हेल्पलाईन चलाई जाती है। एचआईवी/ एड्स, गुप्तरोग व टीबी बीमारियों को लेकर मन में उठ रहे कई सवाल जो दोस्त, रिश्तेदार या समाज के व्यक्तियों के साथ खुले दिल से नहीं कहे जा सकते, ऐसे सवालों को फोन के जरिए गोपनियता रखकर निष्पक्षता से शास्त्रीय जवाब समुपदेशन के माध्यम से दिए जाते है। अब तक हेल्पलाईन ने 1 लाख 50 हजार से अधिक फोन काल्स का जवाब दिया। 2 अक्टूबर 2005 से 31 जनवरी 2013 तक हेल्पलाईन को अकोला जिले से 4300 काल्स आए। इसमें 24 एचआईवी मरीज थे। एचआईवी पीड़ित व्यक्ति की समस्या, आर्थिकता का अभाव व सेवाओं को लेकर जानकारी की कमी के चलते मुक्ता फाऊंडेशन व नेटवर्क आफ अकोला बाय पीपल लिविंग वीथ एचआईवी/एड्स ने एआरटी केंद्र के सहयोग से आशा प्रकल्प की शुरूआत की। आशा प्रकल्प के जरिए अब तक 4300 से अधिक फोन हेल्पलाईन को आए। जिसमें 88 प्रतिशत एचआईवी संक्रमित व्यक्तियों का समावेश है।

जानकारी लेने वालों में 53 प्रतिशत पुरूष व 47 प्रतिशत महिलाएं है। इन लोगों ने समय पर एआरटी दवा न लेने से होने वाली दिक्कत तथा सेकन्ड लाईन की दवा अकोला में भी उपलब्ध कराने की उम्मीद हेल्पलाईन पर व्यक्त की। संवाद हेल्पलाईन से एचआईवी के साथ जीवन जीते समय सावधानी बरतने की जानकारी दी जाती है। जरूरत अनुसार शासकीय सुविधा, प्रकल्प, सामाजिक संस्था के संदर्भ में उपलब्ध कराए जाते है। समाज के अन्य व्यक्ति भी एचआईवी/एड्स, गुप्तरोग, टीबी बीमारियों को लेकर निःशुल्क जानकारी हेतु संवाद हेल्पलाईन 020- 26381234 सुबह 9.30 से रात 8.30 बजे तक फोन कर जानकारी हासिल कर सकते है या 9028926766 नंबर पर मिस्डकाल कर सकते है।

महाराष्ट्राचा मानबिंदू

# लोकमत

पृष्ठे: १२+४ = १६, किमत: ₹ २.००

अकोला, शनिवार, दि. १७ ऑगस्ट २०१३

## एचआयव्हीग्रस्तांसाठी 'सेवाधर्म'चा पुढाकार

अकोला : एचआयव्ही रिपोर्ट पॉझिटिव्ह आला, आहाराची काळजी कशी घ्यावी, एआरटीची गोळी वेळेवर नाही घेतल्यास काय होते, घरात एकत्र राहिल्याने एचआयव्ही पसरतो का, यासारख्या विविध प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्यासाठी अकोल्यातील सेवाधर्म एज्युकेशन व मल्टीपर्पज सोसायटी या संस्थेने मुक्ता चॅरिटेबल फाऊंडेशन पुणे यांच्या सहकायनि नि:शुल्क संवाद हेल्पलाईन सुरु केली आहे. मागील ८ वर्षात अकोल्यातून ४३० कॉल्स या हेल्पलाईनवर करण्यात आले. पैकी २४ एचआयव्ही रुग्ण होते.

एचआयव्हीबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने सुरु करण्यात आलेल्या या हेल्पलाईनचा उपयोग ०२०-२६३८१२३४ या क्रमांकावर सकाळी ९.३० ते रात्री ८.३० या वेळेत किंवा ९०२८९२६७६६ या क्रमांकावर मिसकॉल करून करता येऊ शकतो.

अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम येथून प्रकाशन

पुरोगामी राष्ट्रीय विचारांचे दैनिक

# हिंदुस्थान

संस्थापक : स्व.श्री बाळकृष्ण विष्णू मराठे

## संवाद हेल्पलाईनची सिध्दता

माझा एच.आय.व्ही. रिपोर्ट पॉझिटिव्ह आला आहे, आता मी काय करू ? एच.आय.व्ही. सोबत आहाराची कशी काळजी घ्यायची ? एआरटीची गोळी वेळेवर नाही घेतली तर काय होते ? घरामध्ये एकत्र राहील्याने एच.आय.व्ही. पसरतो का ? या सारख्या अनेक प्रश्नांना घेउन संवाद हेल्पलाईनमध्ये फोन येतो. याविषयावरती माहिती घेत असतांना मनामध्ये असणाऱ्या भावनांना वाट मोकळी होते, अशा वेळी डोळ्यातील अश्रुंना वाट मिळते, सोबतच अपराधीपणा, भविष्यातील जीवनाविषयी घोर, जीवन संपले याची चिंताही व्यक्त होते. संवाद हेल्पलाईनमधील समुपदेशक फोन करणाऱ्या व्यक्तीचे सर्व प्रश्न एकुन घेउन समुपदेशनाद्वारे शास्त्रीय माहिती देतात. समुपदेशकाशी बोलतांना फोन करणाऱ्या व्यक्तीस समोरचा व्यक्ती माझ्याकरिता आहे. मला समजून घेउन प्रश्नांची उत्तरे देउन एक आधार ही देतो असे त्यांना देतो. यातुन निर्माण होते ती आपले पणाची भावना मग प्रत्येक महिन्याला एआरटी केंद्रामध्ये आल्यानंतर आशा वर्कर कडून फोन घेउन थोडावेळ जरूर बोलले जाते. कधी कधी हे बोलणे एवढा वेळ चालते कि वेळेचा अंदाजाही त्यांना लागत नाही. हे सर्व कोणत्या कथेतील वर्णन नसुन अकोला येथील जिल्हा रूग्णालयातील सत्यता आहे.

मुक्ता चॅरिटेबल फाउंडेशन पुणे अंतर्गत संवाद एच.आय.व्ही., एड्स हेल्पलाईन चालविली जाते. एच.आय.व्ही. , एड्स, गुप्तरोग व टिबी आजाराबाबत मनामध्ये असणारे असंख्य प्रश्न जे मित्र, नातेवाईक किंवा समाजातील व्यक्तींना स्पष्ट बोलु शकत नाही, अशा प्रश्नांना फोन द्वारे नाव किंवा फोन नंबर न विचारता गोपनियतेसह निष्पक्षतेने शास्त्रीय उत्तरे समुपदेशनाद्वारे दिली जातात. आजतागायत हेल्पलाईनने एक लाख पन्नास हजाराहून जास्त फोन घेतलेले आहेत.

२ ऑक्टोबर २००५ ते ३१ जानेवारी २०१३ पर्यंत हेल्पलाईनला अकोला जिल्ह्यामधून ४३० कॉल्स आले होते. त्यामध्ये २४ एच.आय.व्ही. रूग्ण होते. आलेल्या कॉलमधील एच.आय.व्ही. झालेल्या लोकांच्या फोनची संख्या, त्यांना भेडसावणारे प्रश्न, आर्थिकतेचा अभाव व सेवाबाबतच्या माहीतीची कमतरता असे अनेक विषय समोर येत होते. वरिल सर्व गोष्टींचा विचार करून मुक्त फौंडेशन व नेटवर्क ऑफ अकोला बाय पिपल लिव्हिंग वीथ एच.आय.व्ही., एड्स यांनी मिळुन एआटी केंद्राच्या सहकार्यातून आशा प्रकल्पाची सुरूवात फेब्रुवारी २०१२ रोजी केली. आशा प्रतीनीधी ज्या व्यक्तीस माहीती हवी आहे त्यांना हेल्पलाईनला मोफत फोन लावून देते.

आशा प्रकल्पामधून आजतागायत, ४३०० हून जास्त फोन हेल्पलाईनला आले असुन त्यामध्ये ८८% एच.आय.व्ही. झालेल्या व्यक्तीचा समावेश आहे. माहिती घेणाऱ्यामध्ये ५३% पुरूष व ४७% स्त्रियांचा समावेश आहे. हेल्पलाईन मध्ये येणाऱ्या फोनच्या आकडेवारीचा विचार करता हे प्रमाण पुरूष ८०% व स्त्रिया २०% असे आहे. यावरून असे समजते कि, आशा प्रकल्पामुळे जास्तीत जास्त महिलांना या सेवेचा फायदा घेता आलेला आहे.

एआरटीची औषधे वेळेवरती न घेण्याचे कारण आहे ते म्हणजे अकोल्यातील कष्टकरी व्यक्तीचे प्रमाण १५% व शेतकरी वर्गाचे प्रमाण १४% . जर कामच नाही केले तर पोटाला भाकर कशी मिळणार या ओढीमुळे एआरटी गोळी घेण्याकडे दुर्लक्ष होते. गृहीणीचे प्रमाण ९% आहे स्वत:च्या काळजी एवजी पतीची मुले यांचीच काळजी अधिक ज्यामुळे गोळीतील नियमितेचा अभाव जाणवतो. काहिवेळा अशिक्षीतपण किंवा कमी शिक्षण या कारणानी औषधाविषयी असणारे महत्व समजुन घेण्यामध्ये अडचणी येतात ज्यामुळे वारंवार माहिती घेण्याची गरजही त्यांना जाणवतांना दिसते.

पैसे नसल्याने एआरटी औषधे घेण्यासाठी आलो नाही. गाडी भाड्याला पैसेच नव्हते यामुळे गोळी चुकली असे फोनवरून व्यक्ती सांगतो. नागपूर सारख्या ए.आर.टी. केंद्रावरून मिळणारी द्वीतीय स्तरातील औषधे (सेकन्ड लाईन) आणणे त्याहूनही अधिक अडचणीचे असल्याने अकोला मध्येच ती मिळण्याची सुविधा व्हावी ही अपेक्षा ते हेल्पलाईनकडे बोलुन दाखवितात.

संवाद हेल्पलाईन मधून एचआयव्ही सोबत जीवन जगत असतांना काय काळजी घ्यावी याबाबत माहिती दिली जाते. गरजेप्रमाणे शासकिय सुविधा, प्रकल्प, सामाजिक संस्था यांचे संदर्भ ही पुरविले जातात.

समाजातील इतर व्यक्तींना एच.आय.व्ही., एड्स गुप्तरोग व टीबी आजाराविषयी मोफत माहिती मिळावी म्हणून सेवाधर्म एज्युकेशन व मल्टीपर्पज सोसायटी अकोला या सामाजिक संस्थेसोबत मिळून हेल्पलाईनने संपर्क सेवा चालु केली आहे. संपर्क प्रतीनीधी ज्यांना एच.आय.व्ही., एड्स गुप्तरोग व टीबी आजाराविषयी माहिती हवी आहे अशा व्यक्तींना हेल्पलाईनकडे मोफत फोन लावून देतो.

शास्त्रीय माहिती जाणून घेउन व्यक्ती जागृत व्हावा हा त्यापाठिमागचा उद्देश आहे. संवाद हेल्पलाईनच्या ०२०-२६३८१२३४ नंबरवरती सकाळी ९.३० ते रात्री ८.३० यावेळात फोन करून आपणही अधिक माहिती जाणून घेउ शकता किंवा ९०२८९२६७६६ या नंबरवरती मिस्डकोल करा.

वाघमारे, प्रोजेक्ट मॅनेजर
मुक्ता चॅरिटेबल
फाउंडेशन, पुणे